**आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचे कार्यालय**
दुसरा मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई – ४०००२३.
Tel. No. Jt. Commr. २२६२०२३६ * Dy. Commr. २२६६५५६९
E-mail-comm.excise@maharashtra.gov.in

वाचा : १) शासन अधिसूचना, गृहविभाग, क्र. सीएलएआर -१०२१ / १७५ (१) / राउशु-३, दि. ३१ मे, २०२२.
: २) शासन अधिसूचना, गृहविभाग, क्र. सीएलएआर -१०२१ / १७५ (२) / राउशु-३, दि. ३१ मे, २०२२.

विषय :-देशी मद्यावरील उत्पादन शुल्क अधिसूचनेत नमूदप्रमाणे देशी मद्याच्या तीव्रता व प्रकारानुसार आकारण्याबाबत.

**परिपत्रक**

क्रमांक : सीएलआर ११२०२२ / १२१७० / १३४ / ५-ब मुंबई दिनांक ३१ मे, २०२२.

शासनाकडुन त्यांचे पत्र, क्र. सीएलएआर -१०२१ / १७५ / राउशु-३, दि. ३१ मे, २०२२ सोबत उपरोक्त वाचा मध्ये नमुद दोन्ही अधिसूचना या कार्यालयास प्राप्त झाल्या आहेत. त्या तात्काळ आवश्यक कार्यवाहीस्तव व तंतोतंत अंमलबजावणीसाठी यासोबत जोडण्यात येत आहे. वाचा क्र. १ येथील अधिसूनेनूसार देशी मद्याच्या व्याखेत बदल केला असून त्याचबरोबर महाराष्ट्र देशी मद्य नियम, १९७३ चे नियम ६ चा उपनियम (२४) नंतर उपनियम २४-A अंतर्भूत करुन आता देशी मद्याच्या ६२.५° प्रुफ तीव्रता असलेल्या नव्याने अंतर्भुत देशी प्रकारासाठी लेबल केवळ पांढऱ्या कागदावर काळ्या शाईने उपनियम (२४) मध्ये नमुद केल्यानुसार मुद्रीत करणे क्रमप्राप्त केले आहे.

२) तसेच उपरोक्त वाचा येथील अ. क्र. २ नुसार शासनाने गृहविभाग, क्र. एआरएम -१०९६ / २१ /२ इएक्ससी-३, दि. १३ सप्टेंबर, १९९६ या अधिसूचनेसोबतच्या परिशिष्ठातील अनुक्रमांक १० मधील नोंदीऐवजी नवीन नोंदी समाविष्ठ करुन त्यातील पुर्वीची उपनोंद १० (अ) कायम ठेवुन उपनोंद १० (ब) नुसार मोहाफुले व काजुबोंडाव्यतिरिक्त पदार्थापासून प्राप्त मद्यार्कांचा वापर करुन केलेले व ६२.५° प्रुफ तीव्रता असलेली रंगहीन देशी मद्य, उपनोंद १० (क) नुसार मोहाफुले व काजुबोंडाव्यतिरिक्त पदार्थापासून प्राप्त मद्यार्कांचा वापर करुन केलेले व ७५° प्रुफ तीव्रता असलेली रंगहीन देशी मद्य तर उपनोंद १० (ड) नुसार फक्त धान्याधारित मद्यार्क व रंगाचा वापर करुन तयार केलेले व ७५° प्रुफ तीव्रता असलेले "रंगीत " देशी मद्य अशा वेगवेगळया प्रकारासाठी खालीलप्रमाणे वेगवेगळे अबकारी कराचा दर दि.०१-०६-२०२२ पासून लागु केलेला आहे.



Scanned with CamScanner

| उपरोक्त नमुद शा. अधि. १९९६ च्या परिशिष्ठातील नोंद क्रमांक | देशी मद्याचा प्रकार | लागु लेबल | तीव्रता | अबकारी कराचा दर |
|---|---|---|---|---|
| १० (ब) | काजुबोंडे आणि मोहा फुलांव्यतिरिक्त इतर पदार्थांपासून प्राप्त मद्यार्क वापरुन रंगीत पदार्थ न वापरता तयार केलेले व ६२.५° प्रुफ तीव्रता असलेले मद्यार्क (३५.६६ % V/V) | संबंधित नियम ६ (२४A) नुसार "केवळ पांढऱ्या कागदावर काळ्या शाईने उप-नियम (२४) मध्ये नमुद केल्यानुसार मुद्रीत करण्यात यावे" | ६२.५° प्रुफ | उत्पादन मुल्याच्या २२०% किंवा रु. १५५ मद्यार्कांची भरवणी असलेल्या प्रति प्रुफ लिटर करिता यापैकी जे जास्त असेल ते. |
| १० (क) | काजुबोंडे आणि मोहा फुलांव्यतिरिक्त इतर पदार्थांपासून प्राप्त मद्यार्क वापरुन व रंगीत पदार्थ न वापरता तयार केलेले आणि ७५° प्रुफ तीव्रता असलेले मद्यार्क (४२.८% V/V) | संबंधित नियम ६ (२४) नुसार पुर्तता करणारे लेबल | ७५° प्रुफ | उत्पादन मुल्याच्या २२०% किंवा रु. १८० मद्यार्कांची भरवणी असलेल्या प्रति प्रुफ लिटर करिता यापैकी जे जास्त असेल ते |
| १० (ड) | धान्याधारित मद्यार्कामध्ये रंगीत पदार्थाचा वापर करुन तयार केलेले आणि ७५° प्रुफ तीव्रता असलेले मद्यार्क (४२.८% V/V) | संबंधित नियम ६ (२४) नुसार पुर्तता करणारे लेबल | ७५° प्रुफ | उत्पादन मुल्याच्या २५०% किंवा रु. २५० मद्यार्कांची भरवणी असलेल्या प्रति प्रुफ लिटर करिता यापैकी जे जास्त असेल ते |

३) उपरोक्तप्रमाणे महाराष्ट्र देशी मद्य नियम, १९७३ तसेच शासन गृहविभाग, क्र. एआरएम -१०९६ / २१ /२ इएक्ससी-३, दि. १३ सप्टेंबर, १९९६ मध्ये अनुक्रमे वाचा क्र. १ व २ अन्वये दुरुस्ती केल्याने व देशी मद्याच्या सदर प्रकारनिहाय अबकारी कराचा दर दि. ०१-०६-२०२२ पासून लागू होणार असल्याने देशी मद्य निर्मितीत, मद्यप्रकार निहाय वापरावयाच्या लेबलमध्ये व अबकारी करानुसार एमआरपी मध्ये बदल अपेक्षित असल्याने खालीलप्रमाणे आवश्यक मार्गदर्शक सुचना याद्वारे निर्गमित करण्यात येत आहे.

**अ) देशी मद्य निर्माणी ते किरकोळ देशी मद्यविक्री अनुज्ञप्तीसाठी व अधिकाऱ्यांसाठी आवश्यक निर्देश :**

i) दि. ०१-०६-२०२२ पासून उपरोक्त तरतुदीनुसार संबंधित देशी मद्य निर्माणी यथास्थिती तीन वेगवेगळ्या प्रकारापैकी संबंधित अधिसूचना दि. १३ सप्टेंबर, १९९६ मधील नोंद क्र. १० (ब) मधील नमुद देशी मद्य प्रकार म्हणजे "काजुबोंडे आणि मोहा फुलांव्यतिरिक्त इतर पदार्थांपासून प्राप्त मद्यार्क वापरुन व रंगीत पदार्थ न वापरता तयार केलेले आणि अनुक्रमे ६२.५° प्रुफ क्षमतेचे रंगहीन देशी मद्य निर्मिती करावयाची असल्यास त्याबाबत प्रथम नव्याने दाखल महाराष्ट्र देशी मद्य नियम, १९७३ चे नियम ६ (२४ अ) नुसार आवश्यक लेबल या कार्यालयाकडुन मंजूर करुन घेऊन या

Scanned with CamScanner

कार्यालयाच्या परवानगीने सदर प्रकारचे देशी मद्य निर्मिती करता येईल.

ii) तसेच ज्या देशी मद्य निर्माणीस संबंधित अधिसूचना दि. १३ सप्टेंबर, १९९६ मधील नोंद क्र. १० (क) मधील नमुद देशी मद्य प्रकार म्हणजे "काजुबोंडे आणि मोहा फुलांव्यतिरिक्त इतर पदार्थापासून प्राप्त मद्यार्क वापरुन व रंगीत पदार्थ न वापरता तयार केलेले आणि अनुक्रमे ७५° प्रुफ क्षमतेचे रंगहीन देशी मद्य निर्मिती करावयाची असल्यास मंजूर लेबलमध्ये फक्त तीव्रता, कमाल विक्री किंमती व्यतिरिक्त इतर काही दुरुस्ती नसल्यास संबंधित अधीक्षकांना तसा अर्ज केल्यास अधीक्षकांनी तात्काळ अर्जदाराने सादर केलेल्या माहितीची खातरजमा करुन अशा घटकास देशी मद्यासाठी सुधारीत एमआरपी तात्काळ मंजूर करुन सदर देशी मद्य लेबलला यथास्थिती तीव्रता व नव्याने मंजूर करण्यात येणाऱ्या सुधारीत एमआरपीसह लेबल मंजूर करण्याचे अधिकार तात्पुरत्या स्वरुपात एकवेळची बाब म्हणून अधीक्षकांना प्रदान करण्यात येत आहे. त्याप्रमाणे अधीक्षकांनी तात्काळ कार्यवाही करुन अशा मंजूर केलेल्या सुधारीत एमआरपी व लेबलच्या प्रतीसह या कार्यालयास तात्काळ अहवाल पाठवावा. मात्र लेबलमध्ये इतर बदल असल्यास प्राप्त तरतुदीनुसार रितसर आयुक्त कार्यालयाकडुन लेबल मंजूर करुन घ्यावे लागेल. सदर अधिकार अधीक्षकांना दि. १५ जून, २०२२ पर्यंत देण्यात येत आहे.

iii) तसेच ज्या देशी मद्य निर्माणीस संबंधित अधिसूचना दि. १३ सप्टेंबर, १९९६ मधील नोंद क्र. १० (ड) मधील नमुद देशी मद्य प्रकार म्हणजे "धान्याधारीत मद्यार्क व रंगीत पदार्थ वापरुन तयार केलेले आणि ७५° प्रुफ क्षमतेचे रंगीत देशी मद्य निर्मिती करावयाची असेल त्यांनी तसा सविस्तर अर्ज प्रारुप लेबलसह आयुक्त कार्यालयास करुन महाराष्ट्र देशी मद्य नियम, १९७३ चे नियम ६(२४) तसेच लेबल मंजूरीबाबतचे वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार आवश्यक लेबल मंजूर करुन घेऊन या कार्यालयाच्या परवानगीने सदर प्रकारचे रंगीत देशी मद्य निर्मिती करता येईल.

तसेच संबंधित देशी मद्य निर्माणी घटकाने महाराष्ट्र देशी दारु नियमावली, १९७३ चा नियम ६ (३७) मधील तरतुदीनुसार सर्व संबंधित देशी मद्य उत्पादकांनी देशी मद्य निर्मितीकरिता वापरण्यात येणाऱ्या अर्क व स्वाद तसेच वापरण्यात येणारे नैसर्गिक निर्मित रंग हे मान्यताप्राप्त कंपन्यांकडुन विकत घेतलेले असावेत. तसेच त्यांना National Accreditation Boards for Testing and Calibration Laboratories (NABL) मान्यताप्राप्त प्रयोगशाळेचे सदर नैसर्गिक निर्मित रंग मानवी सेवानास अन्न व भेसळ प्रतिबंधक कायद्यानुसार योग्य असल्याचा व मानवी सेवनास अपायकारक नसल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. तसेच विदेशी मद्यासाठी वापरण्यात येणाऱ्या रंगाचा तसेच कृत्रिम रंगाचा व केन शुगर कॅरॅमलचा देशी मद्यासाठी वापर करता येणार नाही. तसे हमीपत्र सादर करणे आवश्यक राहील. याबाबतचे यापुर्वीचे निर्देश कायम राहतील. प्रस्तावित लेबलमध्ये अशा प्रकारचे मद्य धान्याधारीत मद्यार्कापासून तयार करणार असल्याने लेबलवर "केवळ धान्याधारित निर्मित मद्यार्काचा वापर करुन व परवानगीप्राप्त नैसर्गिक रंग व स्वाद घालुन तयार केलेली" अशा उल्लेखासह तसेच लेबलवर ठळक अक्षरात फक्त देशी दारु या शब्दाऐवजी "रंगीत देशी दारु" असे छापण्यात यावे. सदरील रंगीत देशी मद्याची विक्री सद्यस्थितीत केवळ सीएल-३ अनुज्ञप्तीमधुन करण्यात यावी.

iv) अशाप्रकारे वर नमुद नुसार यथास्थिती या कार्यालयाच्या किंवा संबंधित अधीक्षकांच्या मंजूरीनंतर



Scanned with CamScanner

संबंधित घटकाच्या प्रभारी अधिकाऱ्याने त्यांच्या घटकात देशी मद्य प्रकारनिहाय निर्मितीसाठी घटकाकडुन ब्लेंड तयार करण्यापूर्वी परि. २ मधील तक्त्यामध्ये नमुदपैकी कोणत्या प्रकारचे देशी मद्य निर्माण करणार आहे. त्याबाबत घटकाकडुन महाराष्ट्र देशी मद्य नियम, १९७३ मधील CL-VIII नमुन्यातील मद्यार्काच्या मागणीपत्रात (Requisition) धान्याधारित मद्यार्कापासून रंगीत मद्य वा मोहा व काजुबोंडाव्यतिरिक्त पदार्थापासून बनविण्यात येणारे ७५° प्रुफ क्षमतेचे वा ६२.५° प्रुफ क्षमतेचे रंगहीन देशी मद्य निर्मितीसाठी मागणी करत आहे त्याचा स्पष्ट उल्लेख असल्याची खात्री करुन नंतर ब्लेंड व्हॅटमध्ये ब्लेंड तयार करण्याची परवानगी द्यावी.

v) अशा प्रकारे देशी मद्य निर्मिती करतांना प्रत्येक देशी मद्य प्रकारनिहाय वेगवेगळया ब्लेंडीग व्हॅट जोपर्यंत रितसर बॉटलिंग करुन सदर ब्लेंड संपत नाही तोपर्यंत वापरणे बंधनकारक राहील. त्यात इतर प्रकारच्या देशी मद्याचे ब्लेंडचे मिश्रण करता येणार नाही याची नोंद घ्यावी. उपरोक्त परि. क्र. २ मधील तक्त्यामध्ये नमुद एकाच प्रकारच्या देशी मद्य प्रकाराचा शिल्लक ब्लेंड महाराष्ट्र देशी दारु नियम, १९७३ चे नियम ६ (२८) नुसार अपवादात्मक परिस्थितीत प्रभारी अधिकाऱ्यांच्या मान्यतेने मिश्रण करण्यास हरकत नाही.

vi) देशी मद्य निर्माणीमध्ये येणारे मद्यार्क धान्यधारित असल्यास त्याची तशी स्पष्ट नोंद नमुना CL-VII रजिष्टरला करण्याची दक्षता घ्यावी. तसेच स्पिरिट साठवणूक रुम मध्ये अशाप्रकारे मळी आधारित मद्यार्क व धान्याधारित मद्यार्क वेगवेगळया साठवणूक टाक्यात साठविण्याची दक्षता घ्यावी. कोणत्याही परिस्थितीत वेगवेगळ्या किण्वन युक्त पदार्थापासून प्राप्त केलेले मद्यार्काचे मिश्रण मद्यार्क साठवणूक कक्षात (Spirit Storing Room) होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच मळी आधारीत मद्यार्क साठ्यासाठी व धान्याधारित मद्यार्क साठ्यासाठी स्वतंत्र CL-VII नमुन्यातील रजिस्टर अद्यावत ठेवावे. तसे मद्यार्क प्रकारनिहाय नामाभिधान (Nomenclature) CL-VII नमुन्यातील रजिस्टरला करावे. तसेच नमुना CL-VII मधील रजिस्टरमध्ये शेवटी रोज खालीप्रमाणे गोषवारा लिहावा.

**मद्यार्काचा रोजचा गोषवारा**

| अ.क्र. | मद्यार्काचा प्रकार | दिवसाच्या सुरवातीस शिल्लक मद्यार्काचा साठा (ब.लि. आकडे हजारात) | आज रोजी प्राप्त मद्यार्क साठा (ब.लि. आकडे हजारात) | आज रोजी देशी मद्यासाठी वापलेले मद्यार्क (ब.लि. आकडे हजारात) | आज अखेरीस घटकातील शिल्लक मद्यार्क (ब.लि. आकडे हजारात) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | मळी आधारीत मद्यार्क | | | | रकाना क्र. ३ + ४ – (रकाना क्र. ५+ मळी व धान्य आधारीत मिश्रित देशी मद्यासाठी वापरलेले मद्यार्क) | |
| २ | मळी व धान्याआधारीत मिश्रित मद्यार्क | लागू नाही | लागू नाही | येथे मळी आधारीत वापरलेल्या मद्यार्काची माहिती द्यावी | लागू नाही | |
| | | लागू नाही | लागू नाही | येथे धान्य आधारीत वापरलेल्या | लागू नाही | |

Scanned with CamScanner

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मद्यार्काची माहिती द्यावी | | |
| ३ | फक्त धान्याधारीत मद्यार्क | | | | रकाना क्र. ३ + ४ – (रकाना क्र. ५+ मळी व धान्य आधारीत मिश्रित देशी मद्यासाठी वापरलेले मद्यार्क) | |
| | एकुण | | | | | |

वरीलप्रमाणे गोषवारा रोज प्रभारी अधिकारी यांनी पडताळुन प्रमाणित करणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे वरील नमुन्यातील मासिक विवरणही CL-XII नमुन्यातील मासिक विवरणासह जोडुन सादर करणे क्रमप्राप्त राहील.

vii) त्यानंतर देशी मद्य निर्मितीसाठी नमुना CL-VIII मधील मागणीपत्र देतांना त्यात घटकांस नेमके कोणत्या प्रकारचे मद्यार्क (धान्याधारित / मळी आधारित इ.) व किती प्रमाणात पाहिजे ते घटकाने स्पष्ट नमुद करणे आवश्यक आहे. प्रभारी अधिकाऱ्यांनीही याबाबत आवश्यक ती दक्षता घ्यावी.

viii) अशाप्रकारे प्राप्त मद्यार्क देशी मद्य प्रकार निहाय संबंधित ब्लेंडींग व्हॅट मध्ये घेऊन त्यापासून रितसर मंजूरीप्रमाणे यथास्थिती धान्याधारित रंगीत देशी मद्य वा काजुबोंडे किंवा मोहाफुले व्यतिरिक्त पदार्थापासून मद्यार्काचा वापर करुन यथास्थिती ७५° प्रुफ क्षमतेचे वा ६२.५° प्रुफ क्षमतेचे रंगहीन देशी मद्य तयार करण्यास प्रभारी अधिकाऱ्याची नियमानुसार मान्यता घेऊन आवश्यक त्या नोंदी संबंधित नमुना CL-IX रजिष्टरला खाडाखोड न करता घेण्याची दक्षता घ्यावी.

ix) नमुना CL-IX रजिस्टरमधील रकाना क्र. २ मध्ये मागणीपत्र क्रमांकानंतर कसांत लाल शाईने कोणते मद्यार्क वापरण्यात येत आहे जसे (धान्याधारित / मळी आधारित) हे नमुद करणे आवश्यक राहील. तसेच धान्याधारित मद्यार्क वापरून देशी मद्यनिर्मितीसाठी मागणीपत्र असल्यास रकाना क्र. ११ मध्ये देशी दारुची Variety नमुद केल्यानंतर नंतर कंसात "धान्यापासून रंगीत देशी दारु" असे नमुद करावे, तर इतर प्रकारासाठी "........तीव्रतेची रंगहीन देशी दारु " (रिकाम्या जागी योग्य देशी दारुची तीव्रता नमुद करावी) असे नमुद करणे आवश्यक राहील. तसेच प्रत्येक मद्य प्रकारनिहाय बॅच क्रमांक जाहिर करतांना खालीलप्रमाणे अक्षराने सुरुवात करुन पुढील क्रमांने येणाऱ्या बॅच क्रमांक जाहीर करावा.

| शा. अधि. १९९६ च्या परिशिष्ठातील नोंद क्रमांक | देशी मद्याचा प्रकार | बॅच क्रमांकाकरीता वापरावयाची आद्यक्षरे |
|---|---|---|
| १० (ब) | काजुबोंडे आणि मोहा फुलांव्यतिरिक्त इतर पदार्थापासून प्राप्त मद्यार्क वापरुन रंगीत पदार्थ न वापरता तयार केलेले व ६२.५° प्रुफ तीव्रता असलेले मद्यार्क (३५.६६ % V/V) | LV |
| १० (क) | काजुबोंडे आणि मोहा फुलांव्यतिरिक्त इतर पदार्थापासून प्राप्त मद्यार्क वापरुन व रंगीत पदार्थ न वापरता तयार केलेले आणि ७५° प्रुफ तीव्रता असलेले मद्यार्क (४२.८% V/V) | RV |
| १० (ड) | धान्याधारित मद्यार्कामध्ये रंगीत पदार्थाचा वापर करुन तयार केलेले आणि ७५° प्रुफ तीव्रता असलेले मद्यार्क (४२.८% V/V) | CV |



Scanned with CamScanner

x) नमुना CL-IX मधील रजिस्टरमध्ये शेवटी रोज परि. क्र. २ मधील तक्त्यामध्ये नमुद व यथास्थिती घटकास मान्यता असलेल्या प्रत्येक देशी मद्य प्रकारनिहाय खालीप्रमाणे गोषवारा लिहावा व प्रभारी अधिकारी यांनी ते पडताळुन प्रमाणित करावा.

**मद्य निर्माणीसाठी वापरलेले मद्यार्क तसेच तयार केलेल्या देशी मद्याचा गोषवारा**

| अ. क्र. | देशी मद्य निर्मितीसाठी वापलेले मद्यार्काचा प्रकार | ब्लेंडची तीव्रता | ब्लेंडसाठी एकुण वापरलेले मद्यार्क (ब. लि. आकडे हजारात) | ब्लेंडसाठी वापरलेल्या मद्यार्काची सरासरी तीव्रता (° प्रुफ मध्ये) | तयार केलेला एकुण ब्लेंड (ब. लि. आकडे हजारात) | बंधीत वखारीत शिल्लक देशी मद्य (ब. लि. आकडे हजारात) | ब्लेंडींग व्हॅटमध्ये शिल्लक ब्लेंड (ब. लि. आकडे हजारात) | घाऊक देशी मद्य विक्री अनुज्ञप्तीस निर्गमित केलेले देशी मद्य (ब. लि. आकडे हजारात) | जमा अबकारी कर (रु. लाखात) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | मळी आधारीत मद्यार्क | ६२.५° प्रुफ | | | | | | | | |
| | | ७५° प्रुफ | | | | | | | | |
| २ | मळी व धान्याआधारीत मिश्रित मद्यार्क | ६२.५° प्रुफ | | | | | | | | |
| | | ७५° प्रुफ | | | | | | | | |
| ३ | फक्त धान्याधारीत मद्यार्क | ७५° प्रुफ | | | | | | | | |
| | एकुण | | | | | | | | | |

त्याचप्रमाणे वरील नमुन्यातील मासिक विवरणही CL-XII नमुन्यातील मासिक विवरणासह जोडुन सादर करणे क्रमप्राप्त राहील.

xi) त्यानंतर अशा प्रकारचा देशी मद्यसाठा निर्माणीतील बंधीत वखारीमध्ये (बॉन्डेड वेअर हाऊसमध्ये) पाठविल्यानंतर त्याची वर नमुदप्रमाणे देशी मद्य प्रकारनिहाय अशाप्रकारे वेगवेगळी साठवणूक करावी ज्यामुळे त्यांचे निरीक्षण व गणना करणे सहज सुलभ होईल. तसेच अशा साठ्याचे नमुना CL-X मधील रजिस्टरला व्यवस्थित नोंदी घेणे क्रमप्राप्त आहे. त्यासाठी ज्या घटकात एकापेक्षा जास्त देशी मद्य प्रकार निर्मित होत असतील तेथे वर नमुदप्रमाणे प्रत्येक प्रकारनिहाय देशी मद्य साठ्याचे स्वतंत्र CL-X नमुन्यातील रजिस्टरवर देशी मद्याच्या प्रकारनिहाय नामाभिधान (Nomenclature) करुन अद्यावत करणे क्रमप्राप्त राहील. तसेच असे सर्व रजिस्टरची नियमित तपासणी करुन प्रमाणित करणे प्रभारी अधिकाऱ्यांची जबाबदारी राहील. तसेच निरीक्षण दरम्यान असे सर्व रजिस्टर सादर करणे आवश्यक राहील अन्यथा सदर घटक रितसर कारवाईस पात्र ठरतील.

xii) महाराष्ट्र देशी दारु नियम, १९७३ चे ६ नियम (३८) नुसार परवानगीप्राप्त नैसर्गिक रंग, अर्क व स्वादाबाबतचे (Colour and Flavor) रजिस्टर अद्यावत ठेवणे क्रमप्राप्त राहील.

Scanned with CamScanner

xiii) देशी मद्य निर्माणी तर्फे सादर करण्यात येणाऱ्या CL-XII नमुन्यातील मासीक अहवालाच्या शेऱ्यामध्ये (Remark) कोणत्या प्रकारचे व किती मद्यार्क (धान्याधारित / मळीधारित) वापरले हे नमुद करणे त्याचप्रमाणे CL-XII मधील अ. क्र. ९ येथे Variety of Liquor and Strength या रकाना क्र. १ मध्ये फक्त धान्याधारित मद्यार्काचा वापर करुन रंगीत देशी मद्य निर्मिती केली असल्यास Variety of Liquor and Strength नमुद केल्यानंतर यथास्थिती त्याखाली "धान्याधारित रंगीत देशी मद्य" असे लाल शाईने तसेच इतर प्रकारासाठी " ७५° प्रुफ / ६२.५° प्रुफ क्षमतेचे रंगहिन देशी मद्य" असे स्पष्ट नमुद करुन ते प्रभारी अधिकाऱ्याने पडताळुन प्रमाणित करावे.

xiv) देशी मद्य घाऊक विक्रेत्यांनी CL-XIII नमुन्यातील मागणीपत्रात रकाना क्र. २ येथे नमुद Variety च्या रकान्यात जर फक्त धान्याधारित मद्यार्काचा वापर करुन निर्मित रंगीत देशी मद्य असल्यास Variety चे नाव नमुद केल्यानंतर त्याखाली "धान्याधारित रंगीत देशी मद्य" असे लाल शाईने तर इतर प्रकारासाठी " ७५° प्रुफ / ६२.५° प्रुफ क्षमतेचे रंगहिन देशी मद्य" असे स्पष्ट नमुद करुन सादर करणे आवश्यक राहील. सदर बाब निर्माणीच्या प्रभारी अधिकाऱ्याने पडताळुन खात्री करण्याची जबाबदारी राहील.

xv) देशी मद्य निर्माणी तर्फे घाऊक देशी मद्य विक्री अनुज्ञप्तीसाठी देण्यात येणारे नमुना CL-XIV मधील देशी मद्य वाहतुकीच्या पासमधील रकाना क्र. १ मध्ये फक्त धान्याधारित मद्यार्काचा वापर निर्मित रंगीत देशी मद्य निर्गमित करत असल्यास Variety of Country Liquor नमुद केल्यानंतर त्याखाली "धान्याधारित रंगीत देशी मद्य" असे तर इतर प्रकारासाठी " ७५° प्रुफ / ६२.५° प्रुफ क्षमतेचे रंगहिन देशी मद्य" असे स्पष्ट नमुद करुन ते प्रभारी अधिकाऱ्याने पडताळुन प्रमाणित करावे.

xvi) देशी मद्य घाऊक विक्री अनुज्ञप्तीतील नमुना CL-XV मधील साठा रजिष्टरमध्ये फक्त धान्याधारित मद्यार्काचा वापर करुन निर्मित रंगीत देशी मद्य असल्यास रकाना क्र. २ मध्ये Variety of Country Liquor नमुद केल्यानंतर त्याखाली "धान्याधारित रंगीत देशी मद्य" असे लाल शाईने तर इतर प्रकारासाठी" ७५° प्रुफ / ६२.५° प्रुफ क्षमतेचे रंगहिन देशी मद्य" असे स्पष्ट नमुद करणे आवश्यक राहील.

xvii) देशी मद्य घाऊक विक्री अनुज्ञप्तीतर्फे नमुना CL-XVI मधील दरमहा सादर करण्यात येणारे विवरणाच्या रकाना क्र. २ मध्ये फक्त धान्याधारित मद्यार्काचा वापर करुन निर्मित रंगीत देशी मद्य असल्यास Variety of Liquor and its Strength नमुद केल्यानंतर त्याखाली "धान्याधारित रंगीत देशी मद्य" असे लाल शाईने तर इतर प्रकारासाठी" ७५° प्रुफ / ६२.५° प्रुफ क्षमतेचे रंगहिन देशी मद्य" असे स्पष्ट नमुद करणे आवश्यक राहील.

xiii) घाऊक देशी मद्यविक्री अनुज्ञप्तीतुन (नमुना CL-II) किरकोळ मद्यविक्री अनुज्ञप्तीसाठी नमुना CL-XVII मधील परिवहन पासखाली मद्यसाठा पाठवितांना त्यातील अनु. क्र. ४ मधील 'kind of country liquor' च्या रकान्यात जर फक्त धान्याधारित मद्यार्काचा वापर करुन निर्मित रंगीत देशी मद्य निर्गमित करण्यात येत असल्यास 'kind of country liquor' नमुद केल्यानंतर त्याखाली "धान्याधारित रंगीत देशी मद्य"असे तर इतर प्रकारासाठी" "७५° प्रुफ / ६२.५° प्रुफ क्षमतेचे रंगहिन देशी मद्य" असे स्पष्ट नमुद करणे आवश्यक राहील.



Scanned with CamScanner

xix) देशी मद्य किरकोळ विक्रीसाठीच्या CL-III नमुन्यातील अनुज्ञप्तीधारकाकडुन CL-II अनुज्ञप्तीधारकास देण्यात येणाऱ्या मागणीपत्रातील रकाना क्र. २ मध्ये Varicty of Country liquor नमुद केल्यानंतर त्याखाली फक्त धान्याधारित मद्यार्काचा वापर करुन निर्मित रंगीत देशी मद्याची मागणी असल्यास Varicty of Country Liquor नमुद केल्यानंतर त्याखाली "धान्याधारित रंगीत देशी मद्य" असे तर इतर प्रकारासाठी" "७५° प्रुफ / ६२.५° प्रुफ क्षमतेचे रंगहिन देशी मद्य" असे स्पष्ट नमुद करणे आवश्यक राहील.

xx) देशी मद्य किरकोळ विक्री अनुज्ञप्तीधारकातर्फे ठेवण्यात येणाऱ्या नमुना CL-XXII मध्ये रकाना क्र. २ मध्ये नमुद Varicty of Country Liquor रकान्यात फक्त धान्याधारित मद्यार्काचा वापर करुन निर्मित रंगीत देशी मद्य असल्यास Varicty of Country Liquor नमुद केल्यानंतर त्याखाली "धान्याधारित रंगीत देशी मद्य" असे तर इतर प्रकारासाठी "७५° प्रुफ / ६२.५° प्रुफ क्षमतेचे रंगहिन देशी मद्य" असे स्पष्ट नमुद करणे आवश्यक राहील.

xxi) देशी मद्य किरकोळ मद्यविक्री अनुज्ञप्तीतील नमुना CL-XXIIA मधील Name of Brand खाली ब्रॅन्डनंतर कंसात फक्त धान्याधारित मद्यार्काचा वापर करुन निर्मित रंगीत देशी मद्य असल्यास त्याखाली "धान्याधारित रंगीत देशी मद्य" असेतर इतर प्रकारासाठी "७५° प्रुफ / ६२.५° प्रुफ क्षमतेचे रंगहिन देशी मद्य" असे स्पष्ट नमुद करणे आवश्यक राहील.

xxii) देशी दारु किरकोळ मद्यविक्री अनुज्ञप्तीतर्फे दरमहा देण्यात येणाऱ्या नमुना CL-XXIII मधील मासीक विवरणात रकाना क्र. २ मध्ये नमुद Variety of Country Liquor या रकान्यात फक्त धान्याधारित मद्यार्काचा वापर करुन निर्मित रंगीत देशी मद्य असल्यास Variety of Country Liquor नमुद केल्यानंतर त्याखाली "धान्याधारित रंगीत देशी मद्य" असेतर इतर प्रकारासाठी "७५° प्रुफ / ६२.५° प्रुफ क्षमतेचे रंगहिन देशी मद्य" असे स्पष्ट नमुद करणे आवश्यक राहील.

xxiii) देशी दारु किरकोळ मद्यविक्री अनुज्ञप्तीचा नमुना CL-XXV मधील नमुना रजिष्टरमधील (Sample Register) रकाना क्र. ३ मध्ये नमुद Variety Country Liquor या रकान्यात फक्त धान्याधारित मद्यार्काचा वापर करुन निर्मित रंगीत देशी मद्य असल्यास Variety of Country Liquor नमुद केल्यानंतर त्याखाली "धान्याधारित रंगीत देशी मद्य" असेतर इतर प्रकारासाठी "७५° प्रुफ / ६२.५° प्रुफ क्षमतेचे रंगहिन देशी मद्य" असे स्पष्ट नमुद करणे आवश्यक राहील.

**ब) इतर अत्यावश्यक सुचना :**

i) दिनांक ०१-०६-२०२२ पासून अमंलात येणाऱ्या उत्पादन शुल्काच्या सुधारित दरानुसार उपरोक्त परि. २ मधील तक्त्यात नमुद देशी मद्यावरील प्रकारनिहाय दराप्रमाणे उत्पादन शुल्काची वसूली करावी. यामध्ये कसूर होणार नाही याची दक्षता घ्यावी.

ii) दिनांक ०१-०६-२०२२ पूर्वी उत्पादित झालेल्या व दि. ०१-०६-२०२२ पासून वितरित होणाऱ्या देशी मद्य साठ्यावरील नवीन दराने वर नमुदप्रमाणे देशी मद्याच्या प्रकारनिहाय दराने उत्पादन शुल्क वसूल करणे आवश्यक राहील.

Scanned with CamScanner

यामध्ये तफावत झाल्यास संबंधित प्रभारी अधिकारी जवाबदार राहतील.

iii) दि. ३१-०५-२०२२ रोजी देशी मद्य निर्माणीत शिल्लक असलेल्या सद्याच्या मद्यसाठ्याची, मद्याच्या ब्लेंडची व लेबलच्या साठ्याची प्रभारी अधिकारी यांनी मोजणी करुन त्याबाबचे विवरणपत्र संबंधित अधीक्षक कार्यालयास तात्काळ ई-मेलद्वारे कळवावे. विभागीय उपआयुक्तांनी सदरची माहिती एकत्रित करुन ती या कार्यालयास दि. ०१-०६-२०२२ रोजी सायंकाळपर्यंत ई-मेलद्वारे पाठवावी.

iv) उपरोक्त दरवाढीमुळे देशी मद्याच्या निर्मिती मुल्य व किरकोळ विक्रीच्या कमाल किंमतीत बदल होणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे सदर घटकांनी यथास्थिती घोषित केलेल्या सुधारीत एमआरपी अधीक्षकांनी वर निर्देशित केल्याप्रमाणे तात्काळ प्रमाणित करुन द्यावी. तसेच शासन अधिसूचना, दि. १३ सप्टेंबर, १९९६ मधील परिशिष्ठातील नोंद क्र. १० (क) येथे नमुद देशी मद्य प्रकारासाठीचे लेबल त्यात इतर काही बदल नसल्यास उपरोक्त परि. ३ मधील उपपरिच्छेद "अ" मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे एमआरपी व तीव्रतेच्या बदलासह तात्काळ नियमातील तरतुदीनुसार लागू केलेले लेबल मंजूर करण्याची व त्यानंतर या प्रकारातील देशी मद्य निर्माणीबाबत पुढील कार्यवाही विहीत मुदतीत होईल याची संबंधित अधीक्षकांनी दक्षता घ्यावी.

v) सर्व देशी मद्य उत्पादकांकडे दिनांक ३१-०५-२०२२ अखेर शिल्लक असलेल्या मद्यसाठा, मद्याचा ब्लेंडची व लेबलच्या साठ्याची तपशीलवार माहिती घेण्यात यावी. विभागीय उपआयुक्तांनी सदरची माहिती एकत्रित करुन ती या कार्यालयास दि. ०१-०६-२०२२ रोजी सायंकाळपर्यंत ई-मेलद्वारे पाठवावी.

vi) ज्या देशी मद्य निर्माणीने वर नमुद शासन अधिसुचना दि. १३ सप्टेंबर, १९९६ मधील परिशिष्ठातील नोंद क्र. १० (क) मध्ये तरतुद केल्यानुसार ७५° प्रुफ क्षमतेचे मोहा व काजुबोंडे वगळता इतर मद्यार्कापासून निर्मित रंगहीन देशी मद्य सध्याच्या मंजूर लेबलमध्ये फक्त नवीन एमआरपी मंजूर करुन घेऊन विक्रीची विनंती संबंधित अधीक्षकांना केली असेल त्यांना निर्माणीतील शिल्लक देशी मद्य साठ्यावर सुधारित एमआरपीचे रबरी शिक्के मारुन नवीन दराने अबकारी कर वसुल करुन मद्य विक्रीस परवानगी देण्यात यावी. मात्र कोणत्याही परिस्थितीत स्टिकर्स लावण्यास परवानगी देण्यात येऊ नये. इतर देशी मद्य प्रकारासाठी नव्याने वरनमुद प्रमाणे लेबल मंजूरी करुन यथास्थिती देशी मद्य निर्मिती व नियमानुसार विक्री करता येईल.

vii) जे देशी मद्य उत्पादक शासन अधिसुचना दि. १३ सप्टेंबर, १९९६ मधील परिशिष्ठातील नोंद क्र. १० (क) मध्ये तरतुद केल्यानुसार ७५° प्रुफ क्षमतेच्या रंगहीन देशी मद्याची वाढीव दराने उत्पादन शुल्क भरुन जुन्या एमआरपीने मद्यविक्री करण्यास इच्छुक असतील त्या मद्य उत्पादकांना शिल्लक मद्यसाठा नवीन दराने उत्पादन शुल्क वसुल करुन विक्री करण्यास परवानगी देण्यात यावी.

viii) दि. ३१-०५-२०२२ अखेरीस निर्माणीतील बंधित वखारित तयार शिल्लक ७५° प्रुफ क्षमतेचे मोहा व काजुबोंडे वगळता इतर मद्यार्कापासून निर्मित रंगहीन देशी मद्य साठ्यावर रबरी शिक्के मारता येऊ शकत नसल्यास किंवा संबंधित मद्य उत्पादक सदर साठ्याचे पुन:लेबलिंग करु इच्छित असल्यास पुन:लेबलिंग करण्यास परवानगी देण्याचे अधिकार



Scanned with CamScanner

संबंधित अधिक्षकांना देण्यात येत आहेत.

ix) रबरी शिक्के मारुन जुनी लेबल्स वर निर्देश दिल्याप्रमाणे शासन अधिसुचनेतील परिशिष्ठामधील फक्त नोंद क्र. १० (क) मध्ये तरतुद केल्यानुसार ७५° प्रुफ क्षमतेचे मोहा व काजुबोंडे वगळता इतर मद्यार्कापासून निर्मित रंगहीन देशी मद्यासाठी वापरण्यास घटकाकडील सध्याची लेबल्स संपेपर्यंत किंवा दिनांक ३१-०७-२०२२ यापैकी जे आधी येईल तोपर्यंत वापरण्यास परवानगी देण्यात येत आहे. सदर मुदतीनंतर रबरी शिक्के मारुन जुनी लेबल्स वापरण्यास कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ मिळणार नाही याची सर्व मद्य उत्पादकांनी नोंद घ्यावी.

x) दिनांक ३१-०७-२०२२ अखेर शिल्लक राहणारी जुनी लेबल्स घटकाचे प्रभारी अधिकारी ताब्यात घेतील व त्याबाबतचा अहवाल अधीक्षकांमार्फत या कार्यालयास सादर करतील. शिल्लक साठ्याच्या विल्हेवाटीबाबत स्वतंत्र सूचना देण्यात येतील. लेबल्सचा साठा निरंक असल्यास तसे कळविण्यात यावे.

xi) या धोरणामुळे होणाऱ्या बदलाचा विपरीत परिणाम मद्याच्या विक्री व्यवस्थेवर व त्याअनुषंगाने शासनाच्या महसूलावर होणार नाही याची दक्षता सर्व अधीक्षकांनी घ्यावी.

**क) सदर धोरणाच्या अंमलबजावणीसाठी व शासन महसूल संरक्षित करण्यासाठी सूचना :-**

i) कोणत्याही परिस्थितीत दि. ०१-०६-२०२२ पासून ३ देशी मद्य प्रकारासाठी अधिसूचनेत नमुदप्रमाणे तीव्रता, लेबल व रंगाचा वापर होईल व अधिसूचनेत नमुदप्रमाणे संबंधित मद्यप्रकारासाठी देय अबकारी कर वसुल करण्यात येईल याची जबाबदारी प्रभारी अधिकाऱ्याची राहील. संबंधित अधीक्षकांनी याबाबत वेळोवेळी, दरमहा घटकनिहाय किमान एकदा निरीक्षण करुन सदर नियमातील दुरुस्तीप्रमाणे कार्यवाही होऊन योग्य तो अबकारी कर शासनजमा होत असल्याची खात्री करण्याची दक्षता घ्यावी.

ii) सदर वाचा मध्ये नमुद दोन्ही अधिसूचनेनुसार केलेले बदल धोरणात्मक असून त्याचा प्रत्यक्ष संबंध शासन महसूलाशी असल्याने सदर धोरणाप्रमाणे / तरतुदीप्रमाणे तंतोतंत अमंलबजावणी सर्व प्रभारी अधिकारी व संबंधित अनुज्ञप्तीधारक यांनी करणे क्रमप्राप्त आहे. संबंधित बाब शासन महसूलाशी निगडीत असल्याने मला महाराष्ट्र देशी दारु नियम, १९७३ मधील नियम १०(३) अन्वये प्राप्त अधिकारात सर्व संबंधित अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांना निर्देश देतो की, त्यांनी त्यांच्या जिल्हयातील अशा सर्व देशी मद्य निर्माणीचे (नमुना CL-I अनुज्ञप्ती) महिन्याच्या १ ते १० तारखेपर्यंत भेट देऊन मागील काळातील सर्व मद्य निर्मिती व विक्रीबाबत सखोल निरीक्षण करुन संबंधित निर्णयाची तंतोतंत अंमलबजावणी होत असल्याची खात्री करावी. तसेच सर्व संबंधित अधीक्षकांनी स्वत: तसेच त्यांचे अधिनस्त उप-अधीक्षकांच्या मदतीने मागील महिन्यातील घटकनिहाय एकत्रित अहवाल सोबतच्या विहीत नमुन्यातील गोषवाऱ्यासह विभागीय उपआयुक्तांमार्फत या कार्यालयास दरमहा १५ तारखेपर्यंत पोहचेल अशा पध्दतीने सादर करावा. तसेच संबंधित विभागीय उपआयुक्त यांनाही याद्वारे निर्देश देण्यात येतात की, त्यांनी त्यांच्या विभागातील सर्व अधीक्षकांचा याबाबत स्वतंत्र आढावा दरमहा घेऊन तसा जिल्हानिहाय घटकनिहाय एकत्रित अहवाल मागील महिन्यातील गोषवाऱ्यासह (नमुना सोबत) प्राप्त करुन एकत्रित या कार्यालयास दरमहा १५ तारखेपर्यंत प्रथम ई-मेल (Soft Copy) सह स्वाक्षरीत प्रत या

Scanned with CamScanner

कार्यालयाच्या excise.desk5@gmail.com वर सादर करावी. स्वाक्षरीत प्रत प्रत्यक्ष टपालाद्वारे विहित मुदतीत पोहचेल याची दक्षता घ्यावी. तसेच याबाबत सर्व संबंधीत विभागीय उप-आयुक्त यांनी त्यांच्या अधिनस्त सर्व प्रभारी अधिकारी, संबंधीत अनुज्ञप्तीधारक तसेच अधीक्षकांना योग्य ते मार्गदर्शन करुन सदर धोरणाची तंतोतंत अंमलबजावणी होईल, याची दक्षता घ्यावी.

(कांतीलाल उमाप)
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत माहीती व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१) सर्व विभागीय उपआयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
२) सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,
अधीक्षकांना कळविण्यात येते की, उपरोक्त सूचनांचे पालन करण्यात यावे तसेच सर्व मद्य उत्पादकांनी सुधारीत दरानुसार घोषित केलेले निर्मिती मूल्य, एमआरपी व उत्पादन शुल्क याबाबतची माहिती या कार्यालयास सादर कारावी.
३) सर्व मद्य उत्पादक (मार्फत - संबंधित अधीक्षक, राउशु)
४) सर्व मद्य निर्माण्यांमधील प्रभारी अधिकारी (मार्फत - संबंधित अधीक्षक, राउशु)
५) या कार्यालयातील सर्व राजपत्रित अधिकारी.
६) कार्यालय अधीक्षक, कार्यासन क्रं. ५ यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित. त्यांना निर्देशित करण्यात येते की, दरमहा वर नमुदप्रमाणे विभागीय उपआयुक्त व अधीक्षकांकडुन गोषवारा विहीत वेळेत प्राप्त करुन घेण्याची व आवश्यक कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी.
७) अभिलेख शाखा ५ प्रती.



Scanned with CamScanner

**आयुक्तांचे परिपत्रक क्र. ....... दि. ३१-०५-२०२२ नुसार सादर करावयाचे**

**देशी मद्य निर्माणीचे मासिक विवरण क्र. १**

---

**माहे.......या महिण्याचा मद्यार्कांचा गोषवारा**

**संबंधित सीएल-१ घटकाचा अनुज्ञप्ती क्र. :-**

**संबंधित घटकाचे नाव :-**

**संबंधित घटकाचा पुर्ण पत्ता :-**

| अ.क्र. | मद्यार्कांचा प्रकार | महिण्याच्या सुरवातीस शिल्लक मद्यार्कांचा साठा (ब.लि. आकडे हजारात) | महिण्यात प्राप्त मद्यार्क साठा (ब.लि. आकडे हजारात) | महिण्यात देशी मद्यासाठी वापलेले मद्यार्क (ब.लि. आकडे हजारात) | महिण्याअखेरीस घटकातील शिल्लक मद्यार्क (ब.लि. आकडे हजारात) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | मळी आधारीत मद्यार्क | | | | रकाना क्र. ३ + ४ – (रकाना क्र. ५+ मळी व धान्य आधारीत मिश्रित देशी मद्यासाठी वापरलेले मद्यार्क) | |
| २ | मळी व धान्याआधारीत मिश्रित मद्यार्क | लागू नाही | लागू नाही | येथे मळी आधारीत वापरलेल्या मद्यार्कांची माहिती द्यावी | लागू नाही | |
| | | लागू नाही | लागू नाही | येथे धान्य आधारीत वापरलेल्या मद्यार्कांची माहिती द्यावी | लागू नाही | |
| ३ | धान्याआधारीत मद्यार्क | | | | रकाना क्र. ३ + ४ – (रकाना क्र. ५+ मळी व धान्य आधारीत मिश्रित देशी मद्यासाठी वापरलेले मद्यार्क) | |
| **एकुण** | | | | | | |

नाव पदनाम व दिनांकासह स्वाक्षरी
प्रभारी अधिकारी ...........( येथे घटकाचे नाव लिहावे.)

नाव पदनाम व दिनांकासह स्वाक्षरी
**अधीक्षक**
**राज्य उत्पादन शुल्क----**



Scanned with CamScanner

आयुक्तांचे परिपत्रक क्र. ....... दि. ३१-०५-२०२२ नुसार सादर करावयाचे

देशी मद्य निर्माणीचे मासिक विवरण क्र. २

---

**माहे.......या महिण्यात मद्य निर्माणीसाठी वापरलेले मद्यार्क तसेच तयार केलेल्या देशी मद्याचा गोषवारा**

**संबंधित सीएल-१ घटकाचा अनुज्ञप्ती क्र. :-**

**संबंधित घटकाचे नाव :-**

**संबंधित घटकाचा पुर्ण पत्ता :-**

| अ. क्र | देशी मद्य निर्मितीसाठी वापलेले मद्यार्काचा प्रकार | ब्लेंडची तीव्रता | ब्लेंडसाठी एकुण वापरलेले मद्यार्क (ब. लि. आकडे हजारात) | तयार केलेले एकुण ब्लेंड (ब. लि. आकडे हजारात) | बंधीत वखारीत शिल्लक देशी मद्य (ब. लि. आकडे हजारात) | ब्लेंडींग व्हॅटमध्ये शिल्लक ब्लेंड (ब. लि. आकडे हजारात) | घाऊक देशी मद्य विक्री अनुज्ञप्तीस निर्गमित केलेले देशी मद्य (ब. लि. आकडे हजारात) | जमा अबकारी कर (रु. लाखात) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | मळी आधारीत मद्यार्क | ६२.५° प्रुफ | | | | | | | |
| | | ७५° प्रुफ | | | | | | | |
| २ | मळी व धान्याआधारीत मिश्रित मद्यार्क | ६२.५° प्रुफ | | | | | | | |
| | | ७५° प्रुफ | | | | | | | |
| ३ | फक्त धान्याधारीत मद्यार्क | ७५° प्रुफ | | | | | | | |
| | **एकुण** | | | | | | | | |

नाव पदनाम व दिनांकासह स्वाक्षरी
प्रभारी अधिकारी ...........( येथे घटकाचे नाव लिहावे.)

नाव पदनाम व दिनांकासह स्वाक्षरी
**अधीक्षक**
**राज्य उत्पादन शुल्क----**



Scanned with CamScanner